पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - २२३**

**(सभावृत्तांत)**

दिनांक - १०/०५/२०१६ वेळ – दुपारी २.३० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार दिनांक १०/०५/२०१६ रोजी दुपारी २.३० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम - सभापती
२) मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
३) मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
४) मा.काळे विमल रमेश
५) मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
६) मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
७) मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
८) मा.काटे रोहितअप्पा सुदाम
९) मा.ॲड.संदीप गुलाब चिंचवडे
१०)मा.नेटके सुमन राजेंद्र
११) मा.लोंढे शुभांगी संतोष
१२)मा.वाबळे संजय मल्हारराव
१३)मा.जवळकर वैशाली राहुल

याशिवाय मा.दिनेश वाघमारे-आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.कांबळे-प्र.शहर अभियंता, मा.डॉ.रॉय-आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकुर-उपसंचालक-नगररचना, मा.भोसले–मुख्यलेखापाल, मा.पाटील, मा.चव्हाण-सहशहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.गायकवाड, मा.माने, मा.खांडकेकर, मा.दंडवते, मा.कडुसकर, मा.माछरे, मा.फुंदे, मा.इंदलकर, मा.आष्टीकर-सहा.आयुक्त, मा.दुधेकर, मा.सवणे, मा.इंगळे, मा.तांबे, मा.कपिले, मा.पठाण, मा.पिरजादे मा.बरशेट्टी, मा.जुंधारे, मा. गलबले, मा.ओंभासे, मा.शेख, मा.गायकवाड, मा.भोसले, मा.सोनवणे, मा. मोरे-कार्यकारी अभियंता, मा.बेंडे-प्रशासन अधिकारी, मा.जरांडे-सुरक्षा अधिकारी, मा.लावंड-कायदा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –</u>**

विषय क्र.४०) भाटनगर मैलाशुध्दीकरण केंद्राअंतर्गत खराळवाडी प्रभाग क्र.४० मध्ये कामगार नगर, गंगानगर परिसर व उर्वरित ठिकाणी जलनि:सारण व्यवस्था सुधारणा विषयक कामे करणेबाबत-मा.सुमन नेटके व मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४१) श्री.सुनिल रामु धोत्रे पद-सफाई कामगार यांचे अपिल अर्जावर विचार करणेबाबत-मा.सुमन नेटके व मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४२) वास्तुविशारद/सल्लागार नेमणूक करणेबाबत - मा.सुमन नेटके व मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४३) मे.रिअल लाईफ रियल पिंपल या स्वयंसेवी संस्थेस जागा भाड्याने देणेबाबत-मा.सुमन नेटके व मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४४) प्रभाग क्र.६१ दापोडी गावठाण एस.एम.एस. कॉलनी परिसरात रेडमिक्स पद्धतीने काँक्रीट पेव्हींग व गटर्स करणे व स्थापत्य विषयक कामे करणेबाबत - मा.सुमन नेटके व मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४५) प्रभाग क्र.६१ आंबेडकर पुतळा ते सांगवी पुलापर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूने फुटपाथ करणे व रबर मोल्डींग पेव्हींग ब्लॉक बसविणेबाबत - मा.अमिना पानसरे व मा.शुभांगी लोंढे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४६) ज्योती पानसे असोसिएट यांची आर्किटेक्ट पॅनेलवर नेमणूक करणेबाबत - मा.सुमन नेटके व मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४७) तरतूद वर्ग करणेबाबत - मा.सुमन नेटके व मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४८) मनपाचे पर्यावरण अभियांत्रिकी विभाग व आकाशचिन्ह परवाना विभागाकरिता फर्निचर साहित्य खरेदी करणेबाबत.

विषय क्र.४९) तरतूद वर्ग करणेबाबत - मा.सुमन नेटके व मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५०) सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पातील फ क्षेत्रिय कार्यालयातील कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत-मा.सुमन नेटके व मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५१) सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पातील ड क्षेत्रिय कार्यालयातील कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत - मा.सुमन नेटके व मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५२) श्री.नागवडे जालिंदर देवराव, लिपीक यांचे अपील अर्जावर विचार करणेबाबत-मा.सुमन नेटके व मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५३) श्री.तानाजी मन्याबा लोखंडे, तत्का.सहा.भांडारपाल व श्री.ज्ञानदेव नामदेव गराडे, उपलेखापाल यांचे अपील अर्जावर विचार करणेबाबत -मा.सुमन नेटके व मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

--------

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सूचक – मा.संदीप चिंचवडे अनुमोदक – मा.सुमन नेटके

गोवामुक्ती संग्रामाचे ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक हभप नरेंद्रसिंग सोखी गुरुजी यांचे दुःखद निधन झाले असल्याने त्यांस श्रद्धांजली वाहणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**(मा.दिनेश वाघमारे, आयुक्त यांचा मा.सभापती यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.)**

----------

ठराव क्रमांक –१६१५७ विषय क्रमांक – १
दिनांक – १०/०५/२०१६ विभाग- फ क्षेत्रीय कार्यालय
सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक – मा.विमल काळे
संदर्भ:-मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.फ/क्षेत्रीय/आ/३/कावि/३१६/२०१६ दि.२८/०४/२०१६

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या फ क्षेत्रीय कार्यालयाकडील नि.नो.क्र.५/२/२०१५-२०१६ अन्वये फ क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील स्ट्रॉम वॉटर चेंबर्स गटर्स सफाई करणे व निघणारा गाळ कचरा व राडारोडा, झाडे-झुडपे इ.वाहतुक करुन मोशी कचरा डेपो येथे खाली करुन पसरवून देणेकामी मे.विश्वेश एंटरप्रायजेस निविदा र.रु. ५,४१,०९८/- (अक्षरी र.रु. पाच लाख एक्केचाळीस हजार अठ्ठयाण्णव फक्त) प्र.क्र. २,३,४,५,९,११,१२,१३, व २८ मधील स्ट्रॉम वॉटर चेंबर्स गटर्स सफाई करणे व निघणारा गाळ कचरा व राडारोड, झाडे-झुडपे इ. वाहतुक करुन मोशी कचरा डेपो येथे खाली करुन पसरवून देणे याप्रमाणे ठेकेदाराबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देण्यात आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१५८ विषय क्रमांक – २
दिनांक – १०/०५/२०१६ विभाग- फ क्षेत्रीय कार्यालय
सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक – मा.विमल काळे
संदर्भ:-मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.फ/क्षेत्रीय/आ/३/कावि/३१७/२०१६ दि.२८/०४/२०१६

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या फ क्षेत्रीय कार्यालयाकडील नि.नो.क्र.५/१ २०१५-२०१६ अन्वये फ क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील नाले साफ सफाई करणे व निघणारा गाळ कचरा व राडारोडा, झाडे-झुडपे इ. वाहतुक करुन मोशी कचरा डेपो येथे खाली करुन पसरवुन देणेकामी मे.विश्वेश

एंटरप्रायजेस निविदा र.रु. ३,७९,१३७/- (अक्षरी र.रु. तीन लाख एकोणऐंशी हजार एकशे सदोतीस फक्त) प्र.क्र.२,४,५,९,१३ व २८ मधील नाले साफ सफाई करणे व निघणारा गाळ कचरा व राडारोडा, झाडे-झुडपे इ.वाहतुक करुन मोशी कचरा डेपो येथे खाली करुन पसरुवुन देणे या प्रमाणे ठेकेदारा बरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देण्यात आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१५९ विषय क्रमांक – ३

दिनांक – १०/०५/२०१६ विभाग- करआकारणी व करसंकलन

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.कर/मुख्य/५/कावि/१६६/२०१६ दि.२७/०४/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

करआकारणी व करसंकलन विभागामार्फत शहरातील मिळकतींवर मालमत्ताकराची आकारणी करणेत य़ेते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ नियम ७ अन्वये करयोग्य मुल्य निर्धारण केले नंतर नियम ३९ अन्वये मिळकतकराचे बिल देणेत येते. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक जनेयो-२००७/प्र.क्र.५२/ गृनिधो-२ दिनांक २५/०६/२००७ रोजीचे निर्णयानुसार जेएनएनयुआरएम योजनेअंतर्गत कमी उत्पन्न घटकांसाठी घरकुल योजना प्रकल्प राबविणेत येत आहे.सदर प्रकल्पातील इमारतीमध्ये महापालिका क्षेत्रातील कमी उत्पन्न घटकातील प्राप्त लाभार्थींना मिळकतींचे वाटप करणेत आले असून कर संकलन विभागामार्फत सदर मिळकतींची कर आकारणी करुन मिळकतकराची बिले देणेत आली आहेत. तथापि भारतीय जनवादी युवा संघटना, पिंपरी चिंचवड परिवर्तन पार्टी, श्री साईसेवा प्रतिष्ठान, क्रांतीवीर बिरसा मुंडा आदिवासी सामाजिक संघटना, डेमोक्रॅटिक यूथ फेडरेशन ऑफ इंडिया इत्यादी संघटना तसेच पदाधिकारी यांनी कमी उत्पन्न घटकांचे घरकुल योजनेतील मिळकतींना मिळकत करामध्ये माफी अथवा मिळकत कराची मागणी कमी करणेबाबत विनंती केली आहे.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १२९-१-अ मध्ये विशेष विकास प्रकल्पांच्या इमारतींच्या आणि जमिनींच्या बाबतीत राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, वेळोवेळी निश्चित करील अशा कमी केलेल्या दराने मालमत्ता कर आकारणेची तरतूद आहे.त्या अनुषंगाने मा.स्थायी समिती व मा.महापालिका सभेचा ठराव करुन त्यास शासनाची मान्यता घेणे आवश्यक असल्याने महानगरपालिका हद्दीतील जेएनएनयुआरएम अंतर्गत विकसित केलेल्या कमी उत्पन्न घटकांसाठी घरकुल योजना प्रकल्पातील रहात्या निवासी घरास सवलतीचे दराने मालमत्ता कर रकमेची आकारणी करणे योग्य राहील याकामी खालीलप्रमाणे प्रस्ताव मंजूरीकामी सादर करणेत येत आहे. प्रस्तावः मुंबई महानगरपालिका धर्तीवर महानगरपालिका हद्दीतील जेएनएनयुआरएम अंतर्गत विकसित केलेल्या कमी उत्पन्न घटकांसाठी घरकुल योजना प्रकल्पातील रहात्या निवासी मिळकतीस राज्य शासनाचे मान्यतेने खालीलप्रमाणे सवलतीचे दराने

मालमत्ता कर आकारणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

| अ.क्र. | कालावधी | मालमत्ता कराचा कमी केलेला दर |
|---|---|---|
| 1 | पहिल्या वर्षापासून दहाव्या वर्षापर्यंत | विशिष्ट वर्षात वसूल करण्यात आलेल्या मालमत्ता कराच्या दराच्या 20% |
| 2 | अकराव्या वर्षापासून पंधराव्या वर्षापर्यंत | विशिष्ट वर्षात वसूल करण्यात आलेल्या मालमत्ता कराच्या दराच्या 50% |
| 3 | सोळाव्या वर्षापासून विसाव्या वर्षापर्यंत | विशिष्ट वर्षात वसूल करण्यात आलेल्या मालमत्ता कराच्या दराच्या 80% |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१६० विषय क्रमांक – ४

दिनांक – १०/०५/२०१६ विभाग- फ क्षेत्रीय कार्यालय

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भ:-मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.फक्षे/आ/३/कावि/३१८/२०१६ दि.१२/०४/२०१६

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील मनपा मालकीचे सार्वजनिक शौचालय दैनंदिन साफसफाई व देखभाल करणेकामी थेट पध्दतीने दि.०१/०५/२०१६ पासून दोन महिने अथवा निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीसाठी प्रति शौचालय सिट प्रति महिना र.रु.२५०/- या अनुदान दराने १) मे. भैरवनाथ स्वयंरोजगार सेवा सह. संस्था मर्या. २) मे.राजमाता अहिल्यादेवी होळकर स्वयंरोजगार सेवा सह. संस्था मर्या. ३) मे. श्री.गणेश स्वयंरोजगार सेवा सह. संस्था मर्या. ४) मे. महर्षी वाल्मिकी स्वयंरोजगार सेवा सह. संस्था मर्या. या संस्थेकडून एकुण ४५४ शौचालय सिट्स साफसफाई व देखभालीचे कामांकरीता एकुण अनुदान र.रु २,२७,०००/- पर्यंत काम करुन घेणे व त्यांचेबरोबर मुदतवाढीसाठी करारनामा करुन कामाचे आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१६१ विषय क्रमांक – ५

दिनांक – १०/०५/२०१६ विभाग- स्थापत्य

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भ:-मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/फ-मुख्य/३५२/२०१६ दि.२२/४/२०१६

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.स्थापत्य/फ/HO/७/७/२०१५-१६ प्रभाग क्र. ९ संभाजीनगर येथे एम एन जी एल च्या रस्ता खोदाईमुळे खराब झालेले रस्ते दुरूस्त करणेकामी मे.मोहनलाल मथराणी कन्ट्रक्शन प्रा.लि., नि.र.रु.२२,४०,८९६/- (अक्षरी र.रु.बावीस लाख चाळीस

हजार आठशे शहाण्णव फक्त) पेक्षा २९.९९% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.१६,४७,२९४/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ / घट दरानुसार फरकाची रक्कम अदा / वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१६२ विषय क्रमांक – ६
दिनांक – १०/०५/२०१६ विभाग- स्थापत्य
सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक – मा.विमल काळे
संदर्भ:-मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/फ-मुख्य/३५५/१६ दि.२२/४/२०१६

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.स्थापत्य/फ/HO/७/१९/२०१५-१६ अन्वये प्रभाग क्र.९ संभाजीनगर येथील डांबरी रस्ते किरकोळ दुरूस्तीची अत्यावशक कामे करणेकामी मे.मोहनलाल मथराणी कन्ट्रक्शन प्रा.लि. नि.र.रु.२२,४०,८९६/- (अक्षरी र.रु. बावीस लाख चाळीस हजार आठशे शहाण्णव फक्त) पेक्षा २९.९९% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.१६,४७,२९४/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ / घट दरानुसार फरकाची रक्कम अदा / वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१६३ विषय क्रमांक – ७
दिनांक – १०/०५/२०१६ विभाग- स्थापत्य
सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक – मा.शुभांगी लोंढे
संदर्भ:-मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/फ-मुख्य/३६२/२०१६ दि.२२/४/२०१६

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.स्थापत्य/फ/HO/७/७२/२०१५-१६ अन्वये प्रभाग क्र.५ जाधववाडी कुदळवाडी येथील डांबरी रस्ते दुरूस्तीची अत्यावशक कामे करणेकामी मे.मोहनलाल मथराणी कन्ट्रक्शन प्रा.लि. नि.र.रु.२२,३९,९३३/- (अक्षरी र.रु.बावीस लाख एकोणचाळीस हजार नऊशे तेहत्तीस फक्त) पेक्षा २९.९९% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु. १६,४६,५८६/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील

या अटीस अधिन राहून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१६४ विषय क्रमांक – ८
दिनांक – १०/०५/२०१६ विभाग- स्थापत्य
सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक – मा.शुभांगी लोंढे
संदर्भः-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/क-मुख्य/४९८/१६ दि.२५/४/२०१६
विषयः-प्रभाग क्र.६२ फुगेवाडी सँडविक नाल्याजवळील सीडी वर्क साठी अबँटमेंट वॉल बांधून स्लॅब टाकणे व इतर अनुषंगिक कामे करणे.

विषय क्रमांक ८ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१६५ विषय क्रमांक – ९
दिनांक – १०/०५/२०१६ विभाग- स्थापत्य
सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक – मा.शुभांगी लोंढे
संदर्भः-मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/४ड/कावि/२५१/१६ दि.२५/०४/२०१६

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२४/११-१५-१६ प्रभाग क्र ३६ लांडेवाडी येथील राहुल उदय कॉम्प्लेक्स, आनंदनगर स.नं.१५/१, गुळवेवस्ती बैलगाडा घाट जवळ, श्रीनगर विहिरीजवळ, महात्माफुले शाळेजवळ, शांतीनगर औद्योगिक वसाहत मध्ये मुतारी बांधणेकामी मे.चौधरी कन्स्ट्रक्शन नि.र.रु.१४,००,१७८/- (अक्षरी र.रु.चौदा लाख एकशे अठ्याहत्तर फक्त) पेक्षा २०.०४% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.११,७५,५६१/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१६६ विषय क्रमांक – १०

दिनांक – १०/०५/२०१६ विभाग- स्थापत्य

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक – मा.शुभांगी लोंढे

संदर्भ:-मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/४ड/कावि/२५०/१६ दि.२५/०४/२०१६

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१०/३९-१५-१६ प्रभाग क्र.३३ गवळीनगर मधील आदर्शनगर, गवळीनगर येथे ठिकठिकाणी पेव्हिंग ब्लॉक बसविणेकामी मे.एम बी एंटरप्रायजेस नि.र.रु. २३,३१,५३६/- (अक्षरी र.रु. तेवीस लाख एकतीस हजार पाचशे छत्तीस फक्त) पेक्षा ३०.००% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.१७,१३,६७९/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्क्म अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१६७ विषय क्रमांक – ११

दिनांक – १०/०५/२०१६ विभाग- स्थापत्य

सुचक – मा.शुभांगी लोंढे अनुमोदक – मा.कैलासभाऊ थोपटे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/उद्यान/कावि/२६/२०१६ दि.३०/०४/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.५६/०१/२०१५-१६ मधील काम क्र.१ अन्वये, पिंपरी प्रभाग क्र.४५ मधील जोग महाराज उद्यानाचे नूतनीकरण करणेकामी मे.व्ही. एम. मातेरे निवीदा र.रु.१,८६,१६,३४४/- (अक्षरी र.रु.एक कोटी शहाऐंशी लाख, सोळा हजार तीनशे चौरेचाळीस फक्त) पेक्षा २% जास्त या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.१,८९,८८,६७०/- काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१६८ विषय क्रमांक – १२

दिनांक – १०/०५/२०१६ विभाग- स्थापत्य अ मुख्यालय

सुचक – मा.शुभांगी लोंढे अनुमोदक – मा.कैलासभाऊ थोपटे

संदर्भ:-मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/१अ/९/१६ दि.२/५/२०१६

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागा कडील नि.नो.क्र.स्थापत्य/अ/HO/१८/१०/१५-१६ प्रभाग क्र. १४ मध्ये ठिकठिकाणी पेव्हिंग ब्लॉक बसविणे व अनुषंगिक कामे करणेकामी M/s.Aniket Enterprises, aniket c.nanekar र.रु १९,६०,७८४/- (अक्षरी र.रु एकोनिस लाख साठ हजार सातशे चौ-याऐंशी फक्त) पेक्षा ३३.९३% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु. १३,६०,२६४/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ / घट दरानुसार फरकाची रक्क्म अदा/ वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१६९ | विषय क्रमांक – १३

दिनांक – १०/०५/२०१६ | विभाग- स्थापत्य अ मुख्यालय

सुचक – मा.शुभांगी लोंढे | अनुमोदक – मा.कैलासभाऊ थोपटे

संदर्भ:-मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/१३अ/०८/१६ दि.२/५/२०१६

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.स्थापत्य/अ/HO/१८/६/१५-१६ प्रभाग क्र.१४ प्राधिकरण भागात नाला व स्ट्रॉर्म वॉटर लाईन टाकणे व अनुषंगिक कामे करणेकामी M/s.Aniket Enterprises, aniket c.nanekar र.रु २१,००,८४०/- (अक्षरी र.रु एकवीस लाख आठशे चाळीस फक्त) पेक्षा ३६.९९% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु. १३,८९,९२६/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ / घट दरानुसार फरकाची रक्क्म अदा/ वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१७० | विषय क्रमांक – १४

दिनांक – १०/०५/२०१६ | विभाग- स्थापत्य अ मुख्यालय

सुचक – मा.शुभांगी लोंढे | अनुमोदक – मा.कैलासभाऊ थोपटे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/१३अ/५/१६ दि.२०/४/२०१६

विषय:-मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये स्थापत्य विषयक सुधारणांची कामे करणे.

विषय क्रमांक १४ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१७१ विषय क्रमांक – १५

दिनांक – १०/०५/२०१६ विभाग- विद्युत मुख्यालय

सुचक – मा.शुभांगी लोंढे अनुमोदक – मा.कैलासभाऊ थोपटे

संदर्भः-मा.सह शहर अभियंता यांचे जावक क्र.विमुका/५/कावि/१६/२०१६ दि.२/५/२०१६

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.23/2015-2016 मधील अ.क्र.5 अन्वये प्र.क्र.४८ रहाटणी येथील रहाटणी फाटा ते रहाटणी शाळा या रस्त्यावरील नियोजित रस्ता दुभाजकात दिवाबत्तीची व्यवस्था करणेकामी मे.आर.एन. एंटरप्रायजेस नि.र.रू. 16,93,860/- [अक्षरी र.रू. सोळा लाख त्र्याण्णव हजार आठशे साठ फक्त] पेक्षा 41.30% कमी या ठेकेदाराबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१७२ विषय क्रमांक – १६

दिनांक – १०/०५/२०१६ विभाग- स्थापत्य फ मुख्यालय

सुचक – मा.शुभांगी लोंढे अनुमोदक – मा.कैलासभाऊ थोपटे

संदर्भः-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/फ-मुख्य/५०२/१६ दि.२/५/२०१६

विषयः-प्रभाग क्र.३ चिखली येथील सर्व डी पी रस्ते विकसीत करणे.

विषय क्रमांक १६ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१७३ विषय क्रमांक – १७

दिनांक – १०/०५/२०१६ विभाग- स्थापत्य फ मुख्यालय

सुचक – मा.शुभांगी लोंढे अनुमोदक – मा.कैलासभाऊ थोपटे

संदर्भः-मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/फ-मुख्य/५०१/१६ दि.२/५/२०१६

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.५५/५/२०१५-१६ प्रभाग क्र.६० मध्ये मुख्यालय स्तरावर डांबरी रस्त्यांची दुरुस्तीची कामे करणे. सन २०१४-२०१५ कामी मे.मोहनलाल मथराणी कन्स्ट्रक्शन प्रा.लि., नि.र.रु.१६,१०,६४४/- (अक्षरी र.रु.सोळा लाख दहा हजार सहाशे चव्वेचाळीस फक्त) पेक्षा १४.९९% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.१४,३७,६६९/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ / घट दरानुसार फरकाची रक्क्म अदा / वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१७४ विषय क्रमांक – १८

दिनांक – १०/०५/२०१६ विभाग- स्थापत्य फ मुख्यालय

सुचक – मा.शुभांगी लोंढे अनुमोदक – मा.कैलासभाऊ थोपटे

संदर्भ:-मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/फ-मुख्य/४९९/१६ दि.२/५/२०१६

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.५५/१७/२०१५-१६ प्रभाग क्र.५८ मध्ये मुख्यालय स्तरावर डांबरी रस्त्यांची दुरुस्तीची कामे करणे (सन २०१४-१५) कामी मे.क्लीन्सी कन्स्ट्रकशन प्रा.लि नि.र.रु.१६,१०,६४४/- (अक्षरी र.रु.सोळा लाख दहा हजार सहाशे चव्वेचाळीस फक्त) पेक्षा १४.६५% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.१४,४३,४१९/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ / घट दरानुसार फरकाची रक्कम अदा / वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१७५ विषय क्रमांक – १९

दिनांक – १०/०५/२०१६ विभाग- नगररचना व विकास

सुचक – मा.शुभांगी लोंढे अनुमोदक – मा.कैलासभाऊ थोपटे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नरवि/कावि/पिं.नि./९/१०२२/२०१६

दि.०३/०५/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मौजे पिंपळे निलख भागाची विकास योजना महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, यांचे कडील अधिसुचना क्रं.टीपीएस – १८९३/१२७६/सी.आर-१७४/युडी - १३. दि.१८/०९/१९९५ अन्वये शासनाकडुन मंजुर करणेत आली आहे. सदर विकास योजनेनुसार मौजे पिंपळे निलख येथील स.नं. २७ व २८ मध्ये ४५.०० मी.रूंद रस्ता, २४.०० मी.रूंद रस्ता , आरक्षण क्र.३८८ व ३८९ शॉपिंग सेंटर व या शॉपिंग सेंटर आरक्षणा लगत उत्तर - दक्षिण १२.०० मी. रूंद रस्ता प्रस्तावित केलेला आहे.सद्यस्थितीमध्ये स.नं. २७ व २८ मधून जाणा-या नाशिक फाटा - वाकड या बीआरटीएस रस्त्याचे काम पुर्ण झालेले आहे.तसेच वाकड - वाय जंक्शन- औंध या २४.०० मी. रूंद रस्त्याचे कामही पुर्ण झाले आहे. सध्या सदर भागाचा विकास झपाट्याने होत आहे.सदर ठिकाणचे आरक्षण क्र.३८८ व ३८९ शॉपिंग सेंटर हे आरक्षण विकसित करणेकरीताही उत्तर - दक्षिण १२.०० मी. रस्त्याची अत्यंत आवश्यकता आहे. तसेच वाहतुकीच्या नियोजनाच्या दृष्टीने नाशिक फाटा - वाकड हा बीआरटीएस ४५.०० मी. रूंद रस्ता व वाकड - वाय जंक्शन- औंध या २४.०० मी. रूंद रस्ता हे दोन्ही रस्ते उत्तर - दक्षिण १२.०० मी.रूंद डी.पी. रस्त्याने जोडणे

आवश्यक आहे. त्यामुळे ४५.०० मी व २४.०० मी. रूंद रस्ते जोडले जाऊन वाहतुकीच्या दृष्टीने उपयुक्त होईल. तसेच सदर रस्त्यालगत असणारे शॉपिंग सेंटरही विकसित करता येईल. तरी सदर रस्त्याचे जागेच्या भुसंपादनाचा प्रस्ताव तयार केलेला असुन सदर भुसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी पुणे यांचेकडे पाठविणे कामी मा.महापालिका सभा ठराव क्र.८२२ दिनांक - २०/०२/२०१६ अन्वये मंजूरी मिळालेली आहे. तरी उपरोक्त प्रस्तावित १२ मी. रूंद रस्त्याचे आरक्षणाखालील जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व नविन भूसंपादन कायदा अन्वये संपादन करणेकामी सदरच्या १२ मी.रूंद रस्त्याचे भूसंपादन करणेकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१७६ विषय क्रमांक – २०

दिनांक – १०/०५/२०१६ विभाग- वैद्यकीय मुख्य कार्यालय

सुचक – मा.शुभांगी लोंढे अनुमोदक – मा.कैलासभाऊ थोपटे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वैद्य/३/कावि/२८५/२०१६ दि.०३/०५/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

डॉ.जगदीश श्रीखंडे, डॉ.उमा पारधी व डॉ.वैशाली साठे, नेत्ररोग तज्ञ यांना वायसीएम रुग्णालयात व डॉ.सिमा कामत, नेत्ररोग तज्ञ यांना तालेरा रुग्णालयात तसेच डॉ.दिपा लुकडे, नेत्ररोग तज्ञ यांना भोसरी रुग्णालयात मानसेवी नेत्ररोग तज्ञ वैद्यकीय अधिकारी पदावर दरमहा एकत्रित र.रु.५,०००/- या मानधनावर आदेशाच्या दिनांकापासून ६ महीने या कालावधीसाठी नेमणुक देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१७७ विषय क्रमांक – २१

दिनांक – १०/०५/२०१६ विभाग- प्रशासन

सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक – मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशासन/९/कावि/६६/२०१६ दि.०२/५/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

श्री.प्रसाद भास्कर देशपांडे, कार्यालय अधिक्षक यांचे अपिल अर्जावर विचार करणे. कामी (स्थायी समिती ठराव क्रमांक १४७८३ दि.१९/१/२०१६ नुसार) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५६(४) नुसार महापालिका अधिका-यास किंवा कर्मचा-यास खालच्या पदावर आणण्यात आले असेल, काढून टाकण्यात आले असेल, किंवा बडतर्फ करण्यात आले असेल तर अशा शास्तीचे आदेश कळविल्यापासून एक महिन्याच्या मुदतीत अपिल करण्याच प्रावधान आहे. त्यामुळे श्री. देशपांडे यांचा विषयांकित अपिल अर्ज नियमाधिन, कायदेशीर नसल्याने त्यांच्यावर केलेल्या शास्तीबाबत अपिल करण्याची तरतुद अधिनियमात नाही. यास्तव श्री. देशपांडे प्रसाद भास्कर यांचेवर केलेली शास्ती योग्य असल्याने त्यांच्या उपरोक्त अपिल अर्जाचा विचार करू नये

प्रस्तावित केले असले तरी मुदतीनंतरचे अपिल मान्य करून महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम ५६ (४) मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.प्रशा/६/कावि/४६४/२०१२ दि.०९/०८/२०१२ चे आदेशान्वये लादलेली शास्ती रद्द करणेबाबतचे श्री.देशपांडे यांचे अपिल त्यांची निर्वेध सेवा व मा.आयुक्त यांचा प्राप्त अहवाल अवलोकन करता प्रकरणी झालेली शास्ती रद्द करण्यास व तदअनुषंगिक त्याचा आर्थिक लाभ देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१७८ विषय क्रमांक – २२
दिनांक – १०/०५/२०१६ विभाग- स्थापत्य फ मुख्यालय
सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक – मा.वैशाली जवळकर
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/फ-मुख्य/५०४/१६ दि.२/५/२०१६

विषयः-प्रभाग क्र. १ तळवडे येथे अंतर्गत रस्ते विकसीत करणे.

विषय क्रमांक २२ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१७९ विषय क्रमांक – २३
दिनांक – १०/०५/२०१६ विभाग- स्थापत्य क मुख्यालय
सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक – मा.वैशाली जवळकर
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/क-मुख्य/५०६/१६ दि.२/५/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र. ४८/१७/२०१५-१६ अन्वये बोपखेल वार्ड क्र.६४ मधील विकास आराखड्यातील रस्ते विकासित करणेकामी मे.अजवाणी इन्फ्रा प्रा.लि. नि.र.रु. ३७,२९,८९४/- (अक्षरी र.रु.सदतीस लाख एकोणतीस हजार आठशे चौ-याण्णव फक्त) पेक्षा २१.१०% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु. ३०,९०,०३१/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ / घट दरानुसार फरकाची रक्क्म अदा / वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१८० विषय क्रमांक – २४
दिनांक – १०/०५/२०१६ विभाग- स्थापत्य क मुख्यालय
सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक – मा.वैशाली जवळकर
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/क-मुख्य/५०५/१६ दि.२/५/२०१६
विषयः-प्र.क्र.६४ मधील केसरीनगर, रामनगर रस्ता BBM पध्दतीने विकसित करणे.

विषय क्रमांक २४ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१८१ विषय क्रमांक – २५

दिनांक – १०/०५/२०१६ विभाग- स्थापत्य फ मुख्यालय

सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक – मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/फ-मुख्य/५००/१६ दि.२/५/२०१६

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.५५/५/२०१५-१६ प्रभाग क्र.२ त्रिवेणीनगर मधील ताम्हाणेवस्ती मधील सोसायट्यांचे रस्ते हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणेकामी मे.क्लीन्सी कन्स्ट्रक्शन प्रा.लि., नि.र.रु.२२,४०,४४०/- (अक्षरी र.रु.बावीस लाख चाळीस हजार चारशे चाळीस फक्त) पेक्षा २१.२२% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.१८,५३,२७०/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ / घट दरानुसार फरकाची रक्क्म अदा / वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१८२ विषय क्रमांक – २६

दिनांक – १०/०५/२०१६ विभाग- स्थापत्य क मुख्यालय

सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक – मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/क-मुख्य/४९७/१६ दि.२२/४/२०१६

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.८/६०/२०१५-१६ प्र.क्र.४१ गांधीनगर येथील ठिकठिकाणचे रस्ते हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणेकामी मे.मोहनलाल मथराणी कन्स्ट्रक्शन प्रा.लि., नि.र.रु.१४,२८,७१४/- (अक्षरी र.रु.चौदा लाख अठ्ठावीस हजार सातशे चौदा फक्त) पेक्षा २८.९९% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.१०,६५,२५६/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ / घट दरानुसार फरकाची रक्क्म अदा / वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१८३ विषय क्रमांक – २७

दिनांक – १०/०५/२०१६ विभाग- स्थापत्य क मुख्यालय

सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक – मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/क-मुख्य/४९६/१६ दि.२२/४/२०१६

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे – मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र. ८/३३/२०१५-१६ प्र.क्र.४० खराळवाडी येथील एच.ए.ग्राऊंड व गंगानगर येथील रस्ते हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणेकामी मे. मोहनलाल मथराणी कन्स्ट्रक्शन प्रा.लि. नि.र.रु.१४,३१,८५७/- (अक्षरी र.रु. चौदा लाख एकतीस हजार आठशे सत्तावन्न फक्त) पेक्षा २८.९९% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.१०,६७,६००/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ / घट दरानुसार फरकाची रक्कम अदा / वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१८४ विषय क्रमांक – २८

दिनांक – १०/०५/२०१६ विभाग- मुख्य लेखा परिक्षण

सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक – मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/६४/२०१६ दि.२०/०४/२०१६

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे –

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.०४.०४.२०१६ ते दि.१०.०४.२०१६ अखेर संपणा-या आठवडयाचा मा.मुख्यलेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/६४/२०१६ दि.२०.०४.२०१६ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१८५ विषय क्रमांक – २९

दिनांक – १०/०५/२०१६ विभाग- मुख्य लेखा परिक्षण

सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक – मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/६५/२०१६ दि.२६/०४/२०१६

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे –

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.११.०४.२०१६ ते दि.१७.०४.२०१६ अखेर संपणा-या आठवडयाचा मा.मुख्यलेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/६५/२०१६ दि.२६.०४.२०१६ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१८६ विषय क्रमांक – ३०

दिनांक – १०/०५/२०१६ विभाग- वायसीएमएच

सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक – मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.YCMH/भांडार/१/कावि/४०/२०१६ दि.०४/०५/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील एक्स-रे विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने रेडिएशन मॉनिटरींग डिव्हाईस वापरणेत येत असते. सदर डिव्हाईस/रेडिएशन बॅजेस (टी.एल.डी.बॅजेस) दर त्रैमासिक तपासणीकामी मे. रेनेनटेक लॅबोरेटरिज प्रा.लि. गोरेगांव, मुंबई यांचेकडे पाठविले जातात. सन २०१६-१७ करिता रेडिएशन बॅजेस तपासणीकामी आवश्यक र.रु. २६,२६१/- (अक्षरी रक्कम रुपये सव्वीस हजार दोनशे एकसष्ट फक्त) मे. रेनेनटेक लॅबोरेटरिज प्रा. लि. गोरेगांव, मुंबई यांना आगाऊ स्वरुपात अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१८७ विषय क्रमांक – ३१

दिनांक – १०/०५/२०१६ विभाग- नगरसचिव

सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक – मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.नगरसचिव यांचे जावक क्र.नस/१/कावि/४६८/२०१६ दि.०४/०५/२०१६

मा.नगरसचिव यांनी शिफारस केलेप्रमाणे –

नगरसचिव विभागात कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावासोबतचे प्रपत्र “अ” मध्ये दर्शविलेप्रमाणे रजा मंजुरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१८८ विषय क्रमांक – ३२

दिनांक – १०/०५/२०१६ विभाग- बांधकाम परवानगी

सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक – मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.बीपी/कावि/थेरगांव/प्र.क्र.४९/५६/२०१६ दि.०४/०५/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

थेरगाव येथील स.नं. ९ मधील आरक्षण क्र. ६२५ पै ६००० चौ.मी. जागा स्व. शंकर (आण्णा) गावडे स्मृती कामगार भवन व सांस्कृतिक भवन बांधण्यास स्व. शंकर (आण्णा) गावडे

स्मृती कामगार भवन समिती यांना हस्तांतरित करुन दिनांक ६/११/२०१३ चे आदेश क्रमांक भूजि/२/कावि/४६१/२०१३ अन्वये मा. आयुक्त यांनी मान्यता दिली आहे. त्यानुसार मा. अध्यक्ष, स्व. शंकर (आण्णा) गावडे स्मृती कामगार भवन समिती यांनी दि.२०/०२/२०१६ चे अर्जान्वये बांधकाम परवानगीसह विकास शुल्क, प्रशमन शुल्क इ. मध्ये सवलत मिळणेकामी नियोजित बांधकाम नकाशे व इतर कागदपत्रासह मागणी केलेली आहे. सदरहू प्रकरणी सादर करण्यात आलेल्या कागदपत्रानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघ यांचेमधील करारनाम्यातील (दि.४/११/२०११) नुसार अट क्र. १८ मध्ये बांधकाम परवानगी प्रकरणी आकारण्यात येणा-या प्रशमन शुल्क व विकास शुल्क तसेच बांधकाम परवानगी फी व इतर शुल्क यांमध्ये सवलत मिळावी अशी तरतुद नमूद करण्यात आली आहे. तसेच सदर करारनाम्यातील अट क्र.१२ नुसार सदरहु प्रकल्पातील जागेची मालकी ही महापालिकेकडेच व इमारतीची मालकी महासंघाकडे रहाणार आहे. तरी प्रस्तुत बांधकाम परवानगी प्रकरणी पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघ यांचेमधील करारनाम्यातील (दि. ४/११/२०११) नुसार अट क्र. १८ नुसार विकास शुल्क व बांधकाम परवानगी छाननी फी पोटी रक्कम रू ५३८५३७०/- सवलत देणे आपेक्षित आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी संघाचे मागणी प्रमाणे प्रशमन शुल्क, विकास शुल्क तसेच बांधकाम परवानगी फी मध्ये सवलत (विकास शुल्क व बांधकाम परवानगी छाननी फी पोटी रक्कम रू. ५३८५३७०/-) देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१८९ विषय क्रमांक – ३३

दिनांक – १०/०५/२०१६ विभाग- उद्यान/वृक्षसंवर्धन

सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक – मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/४/कावि/२०१/२०१६ दि.४/५/२०१६

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे वृक्षसंवर्धन विभागाकडील निविदा नोटीस क्र.२/२०१५-१६ अन्वये वृक्षसंवर्धन विभागासाठी वृक्षसंरक्षक लोखडी पिंजरे खरेदी बाबत मे.रेखा इंजिनिअरींग निविदा रक्कम रूपये ४७,९०,८००/- (अक्षरी र.रू. सत्तेचाळीस लाख नव्वद हजार आठशे फक्त) या ठेकेदाराची निविदा ही सर्वात कमी दराची निविदा (प्रति नग र.रू.९७२/- ) स्विकृत करणेत आली असून त्यांचेशी करारनामा करून घेणेस व प्रस्तुतकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१९०  विषय क्रमांक – ३४

दिनांक – १०/०५/२०१६  विभाग- मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.सुमन नेटके  अनुमोदक – मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.सह आयुक्त यांचे जावक क्र.मभां/२०/कावि/२७७/२०१५ दि.३/५/२०१६

मा.सह आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या आय.टी.आय कासारवाडी विभागासाठी विविध प्रकारचे रॉ मटेरियल साहित्य खरेदी कामी ई निविदा सुचना क्र.१४/२/२०१५-१६ अन्वये ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते त्यामधील लघुत्तम निविदाकार मे.रेखा इंजिनिअरिंग वर्क्स यांचे दरपत्रकातील एकुण ७१ बाबी साहित्याचे दर र.रु. ६१८२९/- स्विकृत करुन सदर पुरवठा धारकांकडून करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करणेकामी केलेल्या संविदेची माहीती अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१९१  विषय क्रमांक – ३५

दिनांक – १०/०५/२०१६  विभाग- जेएनएनयुआरएम

सुचक – मा.अमिना पानसरे  अनुमोदक – मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जेएनएनयुआरएम/३/कावि/१२९/२०१६ दि.४/५/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मे. क्रिसील रिस्क एन्ड इन्फ्रास्ट्रक्चर सोल्युशन्स लि. याचे Project Monitoring & Reform Implementation Support (PMRIS) चे कामकाज करणेकामी करारनामा अटी शर्तीचे अधीन राहून आदेशाचे दिनांकापासून पुढे १२ महिने कालावधीकरीता दरमहा र.रू.९,१०,०००/- + सेवाकर याप्रमाणे १२ महिने कालावधीकरीता एकूण र.रू.१,०९,२०,०००/- + सेवाकर याप्रमाणे खर्च अपेक्षित असून प्रस्तुत कामकाजाकरीता मे. क्रिसील रिस्क एन्ड इन्फ्रास्ट्रक्चर सोल्युशन्स लि. यांची नेमणूक करणेकामी व त्याकामी येणा-या एकूण खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१९२  विषय क्रमांक – ३६

दिनांक – १०/०५/२०१६  विभाग- माहिती व जनसंपर्क

सुचक – मा.सुमन नेटके  अनुमोदक – मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.माजसं/४/कावि/२९/२०१६ दि.०४/०५/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने दि.०९/०५/२०१६ रोजी महात्मा बसवेश्वर जयंतीचे औचित्य साधून दि.०७/०५/२०१६ ते दि.०८/०५/२०१६ या कालावधीत अंकुशराव लांडगे नाटयगृह, भोसरी येथे महोत्सवाचे आयोजन करण्याअंतर्गत विविध प्रबोधनात्मक व सांस्कृतिक

कार्यक्रम तसेच प्रवचन व व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. याकामी फ्लेक्स बॅनर छपाई व फ्रेम भाडे, मान्यवर/कलाकार चहापान, भोजन व्यवस्था, कलाकारांचे मानधन, निवास, नाटयगृह भाडे इ. करीता थेट पध्दतीने र.रु.१,४६,०००/- (अक्षरी र.रु.एक लाख सेहचाळीस हजार फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१९३ विषय क्रमांक – ३७

दिनांक – १०/०५/२०१६ विभाग- स्थापत्य बीआरटीएस

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक – मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/बीआरटीएस/३०८/२०१६ दि.०३/०५/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड मनपामार्फत मुंबई - पुणे रस्त्यावर आकुर्डी खंडोबा चौकात ग्रेडसेपरेटर बांधणेचे काम ठेकेदार मे. अतुर इंडिया प्रा.लि. यांनी नि. क्र. ५७/२००५-०६ अन्वये पूर्ण केलेले आहे. या कामाअंतर्गत झालेल्या कामाची देयके वेळेत न मिळाल्याने देयकाचे रक्कमेवर व्याज मिळावे अशी मागणी ठेकेदाराने केली होती. तथापी ठेकेदारास निविदा अटी व शर्तीनुसार भाग (१) Chapter ४ अ.क्र. ४५ (पान क्र. ८०) अन्वये बिलाचे थकबाकीपोटी व्याज मागता येणार नाही अशी अट मान्य केली असल्याने थकीत देयकावर व्याज मागता येणार नाही असे कळविले आहे. तथापी ठेकेदार मे. अतुर इंडिया प्रा.लि. थकित देयकावर व्याज मिळावे यासाठी Arbitrator नेमणूक करणेकामी मा. उच्च न्यायालयात Petition No.१६/२०१४ दाखल केले होते. मा. उच्च न्यायालयाने दि. २८/१२/२०१५ चे आदेशान्वये मनपाचा युक्तिवाद अमान्य करुन ठेकेदाराने मागणी केल्याप्रमाणे Arbitrator नेमणूकीस मान्यता दिली असून, मा. उच्च न्यायालयाने श्री. अशोक अलासपूरकर, निवृत्त जिल्हा न्यायाधिश, ठाणे यांची Arbitrator म्हणून नेमणूक केली आहे. श्री. अलासपूरकर यांचे सुचनेनुसार Arbitration चे कामकाज सुरुवात करणेपूर्वी व fee expenses अंतिम करणेसाठी दि. १७/२/२०१६ रोजी बैठक आयोजित केली होती. तथापि,मनपाचे विनंतीनुसार सदर बैठक दि. ५/३/२०१६ रोजी आयोजित करण्यात आली होती. मा. Arbitrator यांनी दि. ५/३/२०१६ चे बैठकीत झालेल्या चर्चेबाबत MOM पाठविले आहे. सदर MOM मध्ये प्रत्येक पक्षाने काय करावे हे नमूद केले आहे. तसेच Arbotration fee ठेकेदार व मनपाने स्वतंत्रपणे समप्रमाणात (५०:५०) दयावी लागणार आहे. Arbitration Procedure चे श्री. अलासपूरकर यांनी Fee expenses बद्दल खालीलप्रमाणे सुचविले आहे.(MOM ची प्रत अवलोकनार्थ सोबत जोडलेली आहे.)

४. प्रत्येक Arbitration Sitting साठी Sitting Charges र.रु. ३०,०००/- देय राहील.

५. Reading Charges म्हणून एक वेळेस र.रु. २००००/- देय राहील.

६. Venue Administrative Charges म्हणून प्रत्येक Sitting साठी र.रु. 1500/- Venue मालकास अदा करावी लागेल.

वरील सर्व Charges Contractor व मनपाने समप्रमाणात (50:50) करावा. वरीलप्रमाणे Arbitration ची फी व बैठकीचा खर्च असे मिळून अंदाजे र.रु. २५७५०/- व यापुढे या कामी होणा-या प्रत्येक मिटींगसाठी अंदाजे र.रु. १५७५०/- प्रमाणे येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१९४ विषय क्रमांक – ३८

दिनांक – १०/०५/२०१६ विभाग- मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक – मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.सह आयुक्त यांचे जावक क्र.मभां/७/कावि/३२३/२०१६ दि.०५/०५/२०१६

मा.सह आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे माहिती व जनसंपर्क विभागाकरीता स्मृतिचिन्ह खरेदीकामी कोटेशन नोटीस सु.क्र.२/२०१६-१७ अन्वये प्राप्त लघुत्तम कोटेशनधारक मे. महाकाळ अँड कंपनी यांचेकडून १०० नग स्मृतिचिन्हे एकुण र.रू.८०,०००/- मध्ये खरेदी कामी प्राप्त लघुत्तम दर स्विकृत करून त्यांच्याबरोबर विहित नमुन्यात करारनामा करून पुरवठा आदेश निर्गत करणेस व येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१९५ विषय क्रमांक – ३९

दिनांक – १०/०५/२०१६

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक – मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.संगीता पवार व मा.जितेंद्र ननवरे यांचा प्रस्ताव

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्र.५७ दि.४/०५/२०१६ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने दि.२९ मे ते ६ जून २०१६ या काळात म.न.पा. क्रीडाप्रबोधिनी येथे १२ किशोर व १२ किशोरी खेळाडू (२४ खेळाडू) त्यांचे समवेत २ मार्गदर्शक व २ व्यवस्थापक (एकूण ४ अधिकारी) एकूण संख्या – २८ यांचे महाराष्ट्र राज्य किशोर व किशोरी खो-खो सराव शिबीर – २०१६ आयोजित करणेस व या शिबीरात २ किशोर किशोरी गटाची खो–खो ची मैदाने करणे, त्याच बरोबर शिबीर काळात एकूण ९ दिवस शिबीरातील सर्वांसाठी सकाळचा चहा व नाष्टा, दुपारचे जेवण, दुपारचा चहा व नाष्टा व रात्रीचे जेवण अशी भोजन व्यवस्था व सर्वांसाठी निवास व्यवस्था करणेस व त्याकामी येणा-या र.रु. ६०,०००/- (अक्षरी र.रु.साठ हजार फक्त) चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच सकाळचा चहा व नाष्टा, दुपारचे जेवण, दुपारचा चहा व नाष्टा व रात्रीचे जेवण ई कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन करणेस व बॅनर, बुके, किरकोळ खर्च इ. क्रीडा विभागाचे स्थायी अग्रीमधन मधून करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले-**

ठराव क्रमांक –१६१९६ विषय क्रमांक – ४०

दिनांक – १०/०५/२०१६

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक – मा.वैशाली जवळकर

संदर्भः-मा.सुमन नेटके व मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव-

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या भाटनगर मैलाशुध्दीकरण केंद्राअंतर्गत खराळवाडी प्रभाग क्र. ४० मध्ये कामगारनगर, गंगानगर परिसर व ऊर्वरीत ठिकाणी जलनिःसारण व्यवस्था सुधारणा विषयक कामे करणे निविदा र.रू.२२,४९,८५३/- निविदा क्र. १/२२/२०१५-१६ चे काम ठेकेदार मे.हरिशकुमार रामदास गायकवाड हे मा.स्थायी समिती ठराव क्र.१४९८८ दि.३/२/२०१६, २९.९९% कमी मंजूर दराने, भाववाढ फरकासह करीत आहेत. या कामाची व्याप्ती वाढत वाढत असलेने यापुर्वीचा खर्च मान्यता र.रू. १६,५३,८७८/- व वाढीव र.रू. २१,७३,९२६/- अशी एकुण ३८,२७,८०४/- पर्यंतच्या सुधारित खर्चास याआधी मंजूर केलेल्या दरानेच म्हणजेच निविदा रक्कमेच्या २९.९९% कमी, भाववाढ फरकासह खर्च करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१९७ विषय क्रमांक – ४१

दिनांक – १०/०५/२०१६

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक – मा.वैशाली जवळकर

संदर्भः- श्री.सुनिल रामू धोत्रे पद सफाई कामगार यांचा दिनांक १०/५/२०१६ चा अपिल अर्ज.

विषय क्रमांक ४१ कामी मा.आयुक्त यांचा अहवाल अपेक्षित असलेने तो प्राप्त झालेनंतरचे सभेचे वेळी विषय क्रमांक ४१ चा विचार करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१९८ विषय क्रमांक – ४२

दिनांक – १०/०५/२०१६

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक – मा.वैशाली जवळकर

संदर्भः-मा.सुमन नेटके व मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव-

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत उपरोक्त विषयान्वये कै. अण्णासाहेब मगर स्टेडियम नुतनीकरण विकास आराखडा याकामासाठी महानगरपालिका पॅनल

वर मे.किमया असोसिएटसचे प्रो.प्रा.श्री.माणिक बुचडे यांची वास्तुविशारद/सल्लागार म्हणून नेमणूक करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१६१९९ विषय क्रमांक – ४३

दिनांक – १०/०५/२०१६

सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक – मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.सुमन नेटके व मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव-

मे.रियल लाईफ रियल पिपल या स्वयंसेवी संस्थेला महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयाचे तळमजल्यावरील १०X१० चौ.फुट इतकी जागा दिनांक १४/०६/२०१५ ते दिनांक १३/०५/२०१६ अखेर ११ महिने कालावधी करीता करारनामा करून र.रू. २१,४२५/- या प्रमाणे भाड्याने देण्यात आली आहे. मे.रियल लाईफ रियल पिपल या स्वयंसेवी संस्थेमार्फत गरीब रूग्णांना मोफत जेवण देणे, मोफत औषधे व रक्त पुरविणे, बेवारस रूग्णांना मोफत कपडे देणे, त्यांची स्वच्छता ठेवणे इत्यादी प्रकारची मदत केली जाते. मे. रियल लाईफ रियल पिपल या संस्थेचे मानवतावादी कार्य लक्षात घेता सदर संस्थेस सदर जागा दिनांक १४/०५/२०१६ पासून पुढील ५ वर्षे कालावधीकरिता वार्षिक र.रू. २१,४२५/- या प्रमाणे भाड्याने देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १६२०० विषय क्रमांक – ४४

दिनांक – १०/०५/२०१६

सुचक-मा.सुमन नेटके अनुमोदक–मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.सुमन नेटके व मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

मनपा स्थापत्य विभागाकडील निविदा क्र.१९/३१/२०१५-१६ अन्वये प्रभाग क्र.६१ दापोडी गावठाण एस.एम.एस. कॉलनी परिसरात रेडमिक्स पद्धतीने कॉंक्रीट पेव्हींग व गटर्स करणे व स्थापत्य विषयक कामे करणेचे काम करणेकामी मे.जयराम कन्स्ट्रक्शन निविदा र.रु.१२,५४,१५०/- (अक्षरी र.रु.बारा लाख चौपन्न हजार एकशे पन्नास फक्त) पेक्षा ४४.९३% कमी दराने या ठेकेदाराकडून करारनामा करुन घेण्यास ठराव क्र. १४९२६, दि.०३/०२/२०१६ अन्वये यापुर्वी स्थायी समितीमार्फत मान्यता दिलेली आहे. सदर कामास महापालिका सभा ठराव क्र.६६३ दि.०६/०४/२०१५ अन्वये र.रु.१८,००,०००/- प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. दापोडी गावठाण परिसरात ठिकठिकाणी कॉंक्रीट पेव्हींग करणे व नविन पेव्हींग ब्लॉक बसविणे गरजेचे आहे. सदर कामांतर्गत कॉंक्रीट पेव्हींग करणे व नविन पेव्हींग ब्लॉक बसविणे इ. कामे करणे आवश्यक असल्याने र.रु.४९,८०,०००/- इतकी येत आहे व वाढीव र.रु.३१,८०,०००/- इतकी येत

आहे. तरी ठेकेदाराकडून मंजूर दराने सुधारीत काम करुन घेण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६२०१ विषय क्रमांक – ४५

दिनांक – १०/०५/२०१६

सुचक-मा.अमिना पानसरे अनुमोदक–मा.शुभांगी लोंढे

संदर्भ:-मा.अमिना पानसरे व मा.शुभांगी लोंढे यांचा प्रस्ताव.

मनपा स्थापत्य विभागाकडील निविदा क्र.८/५३/२०१५-१६ अन्वये प्रभाग क्र.६१ आंबेडकर पुतळा ते सांगवी पुलापर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूने फुटपाथ करणे व रबर मोल्डींग पेव्हींग ब्लॉक बसविणेचे काम करणेकामी मे.एस.बी.सवई निविदा र.रु.१५,००,०००/- (अक्षरी र.रु.पंधरा लाख फक्त) पेक्षा ४०.००% कमी या ठेकेदाराकडून करारनामा करुन घेण्यास ठराव क्र. १५८३४, दि.२९/०३/२०१६ अन्वये यापुर्वी स्थायी समितीमार्फत मान्यता दिलेली आहे. सदर कामास महापालिका सभा ठराव क्र.६६३ दि.०६/०४/२०१५ अन्वये र.रु.२०,००,०००/- प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. दापोडी गावठाण परिसरात ठिकठिकाणी नविन रंगीत, रबर मोल्डींग पेव्हींग ब्लॉक बसविणे गरजेचे आहे. सदर कामांतर्गत रबर मोल्डींग पेव्हींग ब्लॉक बसविणे इ. कामे करणे आवश्यक असल्याने र.रु.४९,९०,०००/- इतकी येत आहे व वाढीव र.रु.३४,९०,०००/- इतकी येत आहे. तरी ठेकेदाराकडून मंजूर दराने सुधारीत काम करुन घेण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६२०२ विषय क्रमांक – ४६

दिनांक – १०/०५/२०१६

सुचक-मा.सुमन नेटके अनुमोदक–मा.वैशाली जवळकर

संदर्भ:-मा.सुमन नेटके व मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

ज्योती पानसे असोसिएट यांची मनपाच्या आर्किटेक्ट पॅनेलवर नेमणूक करण्यास व त्यांना आर्किटेक्ट विषयक कामे व इंटिरिअर डिझायनिंगची कामे देण्यास व त्याकामी होणारी फी आर्किटेक्ट कौन्सिलचे नियमानुसार व मनपा ठरवेल त्याप्रमाणे अदा करणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६२०३ विषय क्रमांक – ४७

दिनांक – १०/०५/२०१६

सुचक-मा.सुमन नेटके अनुमोदक–मा.वैशाली जवळकर

संदर्भः-मा.सुमन नेटके व मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

निगडी गावठाण प्रभाग क्र.१३ मध्ये सन २०१६-१७ चे मंजूर अंदाजपत्रकानुसार नवीन कामांच्या निविदा काढणेसाठी प्रस्तावासोबतचे परिशिष्टानुसार वाढ/घट करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रू. ५१,८६,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६२०४ विषय क्रमांक – ४८

दिनांक – १०/०५/२०१६ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक-मा.कैलासभाऊ थोपटे अनुमोदक–मा.जालिंदर शिंदे

संदर्भः-मा.सहआयुक्त यांचे जावक क्र.मभां/८/कावि/२२७/२०१६ दि.७/५/२०१६

मा.सहआयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे पर्यावरण अभियांत्रिकी विभाग व आकाशचिन्ह परवाना विभागासाठी मागणी केलेनुसार आवश्यक फर्निचर साहित्य बाब क्र. १ ते ३ एकुण ३ बाबी मे.श्री.सिद्धिविनायक इंडस्ट्रिज भोसरी यांचेकडील प्राप्त लघुत्तम दराने खरेदी करणेस व त्याकामी येणा-या खर्चास एकुण र.रु.१,९७,२००/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६२०५ विषय क्रमांक – ४९

दिनांक – १०/०५/२०१६

सुचक-मा.सुमन नेटके अनुमोदक–मा.वैशाली जवळकर

संदर्भः-मा.सुमन नेटके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

महानगरपालिकेच्या सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकामधील प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे तरतूद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.३,५९,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६२०६ विषय क्रमांक – ५०

दिनांक – १०/०५/२०१६

सुचक-मा.सुमन नेटके अनुमोदक–मा.वैशाली जवळकर

संदर्भः-मा.सुमन नेटके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

फ क्षेत्रिय कार्यालयामध्ये सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकामध्ये कामांच्या तरतुदीमध्ये प्रस्तावात नमूद प्रमाणे फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.१०,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६२०७ विषय क्रमांक – ५१

दिनांक – १०/०५/२०१६

सुचक-मा.सुमन नेटके अनुमोदक–मा.वैशाली जवळकर

संदर्भः-मा.सुमन नेटके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव...

ड क्षेत्रिय कार्यालयामध्ये सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकामध्ये कामांच्या तरतुदीमध्ये प्रस्तावात नमूदप्रमाणे फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.६,५०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६२०८ विषय क्रमांक – ५२

दिनांक – १०/०५/२०१६

सुचक-मा.सुमन नेटके अनुमोदक–मा.वैशाली जवळकर

संदर्भः-श्री.नागवडे जालिंदर देवराव, लिपीक यांचा दि.५/५/२०१६ चा अपिल अर्ज.

विषय क्रमांक ५२ कामी मा.आयुक्त यांचा अहवाल अपेक्षित असल्याने तो प्राप्त झाल्यानंतरचे सभेचे वेळी विषय क्रमांक ५२ चा विचार करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६२०९ विषय क्रमांक – ५३

दिनांक – १०/०५/२०१६

सुचक-मा.सुमन नेटके अनुमोदक–मा.वैशाली जवळकर

संदर्भः-श्री.तानाजी मन्याबा लोखंडे-तत्का.सहा.भांडारपाल व श्री.ज्ञानदेव नामदेव गराडे,उपलेखापाल यांचा दि.६/५/२०१६ चा अपिल अर्ज.

विषय क्रमांक ५३ कामी मा.आयुक्त यांचा अहवाल अपेक्षित असल्याने तो प्राप्त झाल्यानंतरचे सभेचे वेळी विषय क्रमांक ५३ चा विचार करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/११/कावि/९२३/२०१६
दिनांक – १२/०५/२०१६



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.